# अति महत्वाचे

**सांख्यिकी कक्ष, फोर्ट**


Contact No. : 022 -261 8987
022 -270 8738
Email Id : supt.statunit@gmail.com

मुंबई - ४०० ०३२


दिनांक : ०५ ऑक्टोबर, २०१६.

# UDSTAT/ICD/2016-17/110 of 2016

**परिपत्रक :-**

**विषय : शैक्षणिक वर्ष २०१६-१७ या वर्षाकरीता ऑनलाईन विद्यार्थी संख्या बाबतची (Students on Roll) (www.eoffice.mu.ac.in/statistical) माहिती नोंदविणेबाबत. (दिनांक ३० सप्टेंबर २०१६ नुसार)**

महोदय/महोदया,

सर्व मुंबई विद्यापीठ प्रमुख, सर्व सलग्नीत महाविद्यालये व स्वायत्तता महाविद्यालये यांचे प्राचार्य व संस्था प्रमुख यांचे उपरोल्लेखित केलेल्या विषयाकडे लक्ष वेधू इच्छितो की,

शैक्षणिक वर्ष २०१६-१७ या वर्षाकरीता विद्यार्थी संख्येबाबतची अत्यावश्यक ऑनलाईन माहिती विद्यापीठाच्या **www.eoffice.mu.ac.in/statistical या संकेत स्थळावर (Web Portal)** उपलब्ध असून ती तात्काळ त्यामध्ये भरून पूर्ण करावयाची आहे. (http://mu.ac.in/portal/wp-content/uploads/2014/06/Student-Roll-Format-2016-17.xls या वेबसाइट वर संबंधित माहिती भरण्याविषयीचे Formats प्रमाणे माहिती भरून ती **statistical007@gmail.com** या इमेल वर पाठविण्यात यावे.) (कृपया Hard Copy पाठवू नये.)

सदरची विद्यार्थी संख्येबाबतची माहिती विद्यापीठ आयोग, भारतीय विश्व विद्यालय संघ, केंद्र शासन, उच्च शिक्षण व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई. संचालनालय, उच्च शिक्षण, पुणे, सह-संचालनालय, उच्च शिक्षण, मुंबई विभाग, इत्यादी महत्वाच्या शासकिय नियंत्रक संस्था/विभाग यांना आवश्यक असलेली संबंधित महत्वाची माहिती सर्व संबंधित शासकिय विभागांना ठराविक कालावधीत देणे अनिवार्य असते. व त्याचप्रमाणे माहितीच्या अधिकारांर्तगत विचारण्यात आलेल्या विविध माहितीच्या सदराखालील आवश्यक ती माहिती सुद्धा सादर करणे अनिवार्य असते.

सर्व विद्यापीठ विभाग प्रमुख, सर्व सलग्नित महाविद्यालये, संस्था यांचे प्राचार्य/संचालक, जबाबदार या नात्याने आपणास सूचित करण्यात येते कि, शैक्षणिक वर्ष २०१६-१७ व त्यापुढील प्रत्येक शैक्षणिक वर्षानूसार अत्यावश्यक ऑनलाईन माहिती संकेत स्थळाच्या माध्यमातून आपल्यामार्फत सादर करणे अत्यंत गरजेचे व सक्तीचे आहे याची कृपया आपल्या उच्च स्थरावर नोंद असावी.

**उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता शैक्षणिक वर्ष २०१६-१७ या वर्षाकरीता आवश्यक ती ऑनलाईन विद्यार्थी संख्येबाबतची माहिती (Students on Roll) www.eoffice.mu.ac.in/statistical या संकेत स्थळावर (Web Portal) उपलब्ध असून त्यामध्ये ती भरणे गरजेची आहे. विविध शैक्षणिक बाबींची महत्वाची माहिती लक्षात घेता विद्यापीठ विभाग, सर्व संलग्नित महाविद्यालये/ संस्था यांनी ती ऑनलाईन पध्दतीने नोंदविणे आवश्यक आहे त्याबाबत असलेले आपले अधिकारी वर्ग/ कर्मचारी वर्ग यांना आपल्या उच्च स्थरावरून सुचित करावे की, प्रति शैक्षणिक वर्षानुसार संचालनालयास महत्वपुर्ण माहिती Web Portal वर उपलब्ध विवरण पत्रामध्ये ऑनलाईन स्वरूपात भरून महाविद्यालयातील**

# University of Mumbai

-२-

प्राचार्य यांच्या शिक्का व सहीने परीपुर्ण असलेल्या प्रमाणपत्रासहित सांख्यिकी कक्षास सादर केल्याशिवाय महाविद्यालये/ संस्था यांच्यामार्फत येणारे परीक्षा अर्ज (Exam Form), नोंदणी अर्ज (Enrollment Form), महाविद्यालयांची संलग्नता (Continuation/ Extension), प्राचार्य व शिक्षक मान्यता (Approval), जाहिरात-मसूदा व बिंदू नामावली इत्यादी गोष्टी तपासली जाणार नाहीत.

विद्यापीठ विभाग, सर्व संबंधित महाविद्यालये/ संस्था यांनी सदरची विचारण्यात आलेली विद्यार्थी संख्येबाबतची ऑनलाईन माहिती त्वरीत अपलोड करावी व त्याबाबतचे हमीपत्र/ प्रमाणपत्र भरून मुंबई विद्यापीठ, सांख्यिकी कक्ष, फोर्ट, यांच्याकडून ना-हरकत प्रमाणपत्र (No Objection Certificate) घ्यावे.

त्याचप्रमाणे सदरची संबंधित माहिती भरताना काही तांत्रिक अडचणी आढळ्यास अधिक्षक, सांख्यिकी कक्ष, दुसरा मजला, खोली क्र. २०२ व 022-2270 8738 / 2261 8987 या दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा, अथवा कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत प्रत्यक्ष भेट घेऊन संबंधित माहिती विषयी जाणकारी/मार्गदर्शन करून घेणे, जेणेकरून सदरची संबंधित विचारण्यात आलेली ऑनलाईन माहिती ही योग्य वेळेत, अचूकतेने पुढील योग्य त्या कार्यालयीन कार्यवाहीसाठी सादर करता येईल.

मुंबई : ४०००३२
दिनांक : ०५ ऑक्टोबर, २०१६.

डॉ. एम्. ए. खान,
कुलसचिव

प्रत :-

सर्व मुंबई विद्यापीठ प्रमुख, सर्व सलग्नित महाविद्यालये, व स्वायत्तता महाविद्यालये यांचे व प्राचार्य संस्था प्रमुख यांच्या पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी व माहितीसाठी अग्रेषित.

प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाही करीता रवाना :-

१. संचालक, शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण,मध्यवर्ती इमारत पुणे - ४११ ००१.
२. परीक्षा नियंत्रक, परीक्षा विभाग, मुबंई विद्यापीठ, विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई-४०० ०९८.
३. उपकुलसचिव, संलग्नता विभाग, मुबंई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई- ४०००३२.
४. उपकुलसचिव, घटक महाविद्यालये, मुबंई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई- ४०००३२.
५. उपकुलसचिव, पदवुत्तर विभाग, मुबंई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई- ४०००३२.
६. उपकुलसचिव, विशेष कक्ष, मुबंई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई- ४०००३२.
७. उपकुलसचिव, नाव नोंदणी विभाग, मुबंई विद्यापीठ, विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व),मुंबई-४०० ०९८.
८. अधिक्षक, आवक विभाग, मुबंई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई- ४०००३२.
९. अधिक्षक, आवक विभाग, मुबंई विद्यापीठ, विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई-४०० ०९८.

यांना असे कळविण्यात येते की,विद्यार्थी संख्या (Students on Roll) बाबतची माहिती विद्यापीठ विभाग व संलग्न महाविद्यालये व मान्यता प्राप्त संस्था यांनी भरणे अनिर्वाय असून सदर माहिती न भरल्यास त्या विभागाचे/महाविद्यालय/संस्थेच्या विद्यार्थ्यांचे परिक्षा अर्ज (Exam.Form) व नोंदणी अर्ज (Enrollment Form) महाविद्यालयाची संलग्नता (Continuation/Extension) /प्राचार्य/शिक्षक मान्यता (Approval) व महाविदयालये/संस्थांचे कोणतेही पत्रव्यवहार स्विकारू नयेत तसेच जाहिरात, मसुदा, बिदुंनामावली तपासणी करू नये असे आदेश मा. संचालक, संचालनालय, उच्च शिक्षण विभाग, पुणे, व मा. कुलगुरू, मुबंई विद्यापीठ यांनी दिलेला असून त्याप्रमाणे प्रत्येक विद्यापीठ विभाग/संलग्न महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्थेकडून त्याबाबतचे प्रमाणपत्र संबंधितांकडून घेण्यात यावे.

(डॉ. एम. ए. खान)
कुलसचिव